## नि.नं. ४२ खालील आदेश

(CNR NO. MHSN080015142018)

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता (येथून पुढे '**संहिता**') आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाव्यात नवीन पक्षकार करण्याकरिता व दुरुस्तीसाठी दिलेला आहे.

२. वादीचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. ४ यांनी प्रतिवादी क्र. ३ कडून बेकायदेशीरपणे महाराष्ट्र जमीन महसूल कायदा कलम ८५ प्रमाणे करुन घेतलेल्या क्षेत्राची नोंद रद्द होऊन मिळकत परत दयावी लागणार म्हणून दावा प्रलंबित असताना दावा मिळकत श्री. श्रावण लिंबाजी लोखंडे यांना दि. २२.०५.२०२० रोजी खरेदी दस्त क्र. ९०२ ने विक्री केली आहे. सदर दाव्याकामी खरेदीदार यांना कायदेशीररित्या पक्षकार करणे आवश्यक असल्याने त्यांना प्रतिवादी क्र. ८ म्हणून सामील करण्यात यावे. सदरच्या दुरुस्तीमूळे दाव्याच्या कारणामध्ये बदल होणार नाही तसेच प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नसल्याने सदर दुरुस्ती मंजूर करण्यात यावी अशी वादीची विनंती आहे.

३. प्रतिवादी क्र. १ ने अर्जास त्यांचे म्हणणे देवून दुरुस्ती करण्यास हरकत नसल्याचे सांगितले आहे. याऊलट प्रतिवादी क्र. ३ व ४ यांनी वादीचा अर्ज खोटा व बनावट असून तथाकथीत दस्त हा वादीच्या जाणिवेने केला असल्याने सदरचा अर्ज खर्चासह नामंजूर करावा अशी विनंती केली.

४. वादी व प्रतिवादींतर्फे दोन्ही विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रकरणातील विचाराधीन मुद्दे व त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसहित खालीलप्रमाणे नोंदविले आहेत.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रस्तावित प्रतिवादी क्र. ८ यांना दाव्याच्या कामी आवश्यक पक्षकार करण्याची दुरुस्ती मंजूर करणे गरजेचे आहे का ? | – ***होय.*** |
| २. | काय आदेश ? | – ***अर्ज मंजूर करण्यात येतो.*** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ बाबतः**

५. वादीतर्फे सुविदय विधिज्ञ श्री. बी. वाय. गडदे यांनी असा युक्तीवाद केला की, दावा प्रलंबित असताना सदरची विक्री झाली असल्याने खरेदीदार हा आवश्यक पक्षकार आहे. सदर दुरुस्तीमूळे दाव्याच्या कारणामध्ये अथवा स्वरुपामध्ये बदल होणार नसल्याने दुरुस्ती मंजूर करण्यात यावी.

६. प्रतिवादी क्र. १ तर्फे सुविदय विधिज्ञ श्री. आय. ओ. हादीमनी यांनी दुरुस्ती मंजूर करण्यास हरकत नाही असा युक्तीवाद केला.

७. प्रतिवादी क्र. ३ व ४ तर्फे सुविदय विधिज्ञ श्री. एस. एन. पाटील यांनी असा युक्तीवाद केला की, वादीचा अर्ज खोटा असूना तथाकथीत खरेदीदस्त वादीच्या जाणिवेने केलेला आहे. वादी मागत असलेली दुरुस्ती ही गरजेची नाही त्यामुळे वादीचा अर्ज खर्चासह नामंजुर करावा अशी त्यांनी विनंती केली.

८. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुत दावा हा वाद मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप होऊन पृथक कब्जा मिळण्याकरिता तसेच जाहिरनामा व निरंतर मनाईसाठी दाखल केला आहे. वादीने फे. नि. ४४ कडे अ. क्र. १ ला खाते क्र. ४७८ चा ८ अ उतारा दाखल केला आहे. सदर उताऱ्यावर मल्लाप्पा महादेव गडदे (प्रतिवादी क्र. १) यांचे नाव दिसून येते. वादीने पुढे फे. नि. ४४ कढे अ. क्र. २ ला गट नं. ५३

चा सातबारा उतारा हजर केला आहे. सदर उताऱ्यावर प्रस्तावित प्रतिवादी क्र. ८ श्रावण लिंबाजी लोखंडे यांचे नाव दिसून येते. प्रस्तुत दाव्यामध्ये सर्व आवश्यक पक्षकारांचा समावेश असणे अंतिम न्यायाचे दृष्टीने तसेच हुकूमनाम्याच्या परिणामकारक बजावणीकरिता गरजेचे आहे. प्रस्तावित दुरुस्तीने दाव्याच्या मूळ स्वरुपात कुठलाही बदल होणार नाही. तसेच दावा प्रलंबित असताना दि. २२.०५.२०२० रोजी विक्री झाली असल्यामूळे प्रस्तावित दुरुस्ती मंजूर झाल्यास प्रतिवादींचे काहीएक नुकसान होणार नाही याऊलट ती नामंजूर झाल्यास हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीस अडचण निर्माण होणार आहे. सबब या मुद्दयाचा निष्कर्ष होकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.२ बाबत मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज नि.नं. ४२ मंजूर करण्यात येतो.

२. वादीने प्रस्तावित दुरुस्ती आजपासून १४ दिवसाचे आत दाव्यामध्ये करून दाव्याची दुरूस्त प्रत दाखल करावी.

(खुल्या न्यायालयात घोषीत)

Digitally signed by Shirishkumar Digambar Waghmare
DN: c=IN, o=Bombay High Court, ou=Judiciary, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=27258b50725b8ad0f02b93c79864217287a311295d93b8bfdb3e0b1ef7505488, cn=Shirishkumar Digambar Waghmare
Date: 2021.02.18 17:07:52 +05'30'

दि.१७.०२.२०२१
जत

**(शिरीषकुमार दि. वाघमारे)**
**सहदिवाणी न्यायाधीश, क. स्तर,**
**जत, जि. सांगली.**

मी प्रमाणित करतो की, या पीडीएफ फाईलमधील मजकूर व मुळ आदेशामधील मजकूर हा एकसारखा आहे.

स्टेनोग्राफरचे नांवः एम. एम. बुचडे,
कोर्टाचे नांव : एस. डी. वाघमारे,
सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर
व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी जत.
दि. १७.०२.२०२१
पिठासीन अधिकारी यांनी सही केलेली तारीखः १७.०२.२०२१
आदेश अपलोड केलेली तारीखः १८.०२.२०२१